महाराष्ट्राचा मानबिंदू

लोकमत

**

नाशिक । गुरुवार

५.८.२०२१




यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वतीने आयोजित अल्पसंख्याक शिक्षण संस्था चालकांच्या बैठकीत बोलताना कुलगुरू ई वायुनंदन.

# अल्पसंख्याकांसाठी मुक्त विद्यापीठही करणार प्रयत्न

## ई वायुनंदन : संस्थाचालकांची बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : उर्दू भाषेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक संस्थांनी शिक्षण प्रसारासाठी अधिक सक्रिय होण्याची आवश्यकता असून, उर्दू भाषिकांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. याकरिता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ सर्वतोपरी साहाय्य करील, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन यांनी बुधवारी (दि.४) केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सहयोग व विशेष उपक्रम केंद्रामार्फत मुक्त विद्यापीठातील विविध कौशल्याधिष्ठित आणि रोजगाराभिमुख शिक्षणक्रम उर्दु भाषिक आणि अन्य वंचित घटकांसाठी उपलब्ध करून देण्याच्या हेतूने अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमधील संचालक, प्राचार्य आणि इतर महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची एकदिवसीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे उदघाटन डॉ. वायुनंदन यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख, सहयोग व विशेष उपक्रम केंद्राचे संचालक डॉ. प्रकाश अतकरे, डॉ. उमेश राजदेरकर आदी मान्यवर या बैठकीला उपस्थित होते. विद्यापीठातील विविध विद्याशाखा संचालकांनी विद्याशाखांच्या मार्फत चालविल्या जाणाऱ्या शिक्षणक्रमाची माहिती दिली.

यात डॉ. जयदीप निकम, प्रा. नागार्जुन वाडेकर, डॉ. कविता साळुंके, डॉ. सुनंदा मोरे आदी सहभागी झाले होते. अधिकाधिक लोकांपर्यंत उर्दू भाषेतून कौशल्याधिष्ठित शिक्षण पोहोचविल्यास त्यांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील, तसेच ज्या व्यक्ती अगोदरच संबंधित व्यवसाय करत असतील, त्यांना अधिक व्यावसायिक कौशल्ये मिळू शकतील, असेही प्रा. वायुनंदन म्हणाले, डॉ. सय्यद यांनी उर्दू भाषिकांना मुक्त विद्यापीठाच्या उर्दू भाषेतील शिक्षणक्रमांचा लाभ कसा झाला हे स्पष्ट केले.

www.epunyanagari.com
Toll Free 18002081019
पुण्य नगरी
नाशिक ◆ शुक्रवार, ६ ऑगस्ट २०२१ । वर्ष : २२ । अंक : १२३ । पाने : १०+४=१४ । किंमत : ५.००

# अल्पसंख्यांकाच्या शिक्षणासाठी मुक्त विद्यापीठ प्रयत्नशील : वायुनंदन

**नाशिक :** उर्दू भाषेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक संस्थांनी शिक्षणप्रसारासाठी अधिक सक्रिय होण्याची आवश्यकता आहे. उर्दू भाषिकांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ सर्वतोपरी सहाय्य करणार असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन यांनी केले.



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सहयोग व विशेष उपक्रम केंद्रामार्फत मुक्त विद्यापीठातील विविध कौशल्याधिष्टीत आणि रोजगाराभिमुख शिक्षणक्रम उर्दू भाषिक आणि अन्य वंचित घटकांसाठी उपलब्ध करुन देण्याच्या हेतुने अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांमधील संचालक, प्राचार्य आणि इतर महत्वाच्या पदाधिकाऱ्यांची एक दिवसीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे उद्घाटन डॉ. वायुनंदन यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख, सहयोग व विशेष उपक्रम केंद्राचे संचालक डॉ. प्रकाश अतकरे, डॉ. उमेश राजदेरकर आदी या बैठकीला उपस्थित होते.

दुपारच्या सत्रात विद्यापीठातील विविध विद्याशाखा संचालकांनी विद्याशाखामार्फत चालविल्या जाणाऱ्या शिक्षणक्रमांची माहिती दिली. यात डॉ.जयदीप निकम, प्रा. नागार्जुन वाडेकर, डॉ. कविता साळुंके, डॉ. सुनंदा मोरे आदी सहभागी झाले होते. अधिकाधिक लोकांपर्यंत उर्दू भाषेतून कौशल्याधिष्टीत शिक्षण पोहचविल्यास त्यांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील, तसेच ज्या व्यक्ती अगोदरच संबंधित व्यवसाय करत असतील, त्यांना अधिक व्यावसायिक कौशल्ये मिळू शकतील असेही प्रा.वायुनंदन म्हणाले. डॉ. सय्यद यांनी उर्दू भाषिकांना मुक्त विद्यापीठाच्या उर्दू भाषेतील शिक्षणक्रमांचा लाभ कसा झाला हे स्पष्ट केले. तसेच या शिक्षणक्रमांना मिळणारा प्रतिसाद वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली. डॉ. प्रकाश देशमुख यांनी विद्यार्थी सेवा विभागाच्या कार्याची माहिती दिली. डॉ. नुसरत चौधरी यांनी प्रास्ताविक केले. अभिनी साबळे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले.



ज्ञानगंगा घरोघरी
YASHWANTRAO CHAVAN
MAHARASHTRA OPEN UNIVERSITY
ज्ञानगंगा घरोघरी



